संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

अत्यंत तातडीचे/महत्वाचे

क्रमांक संगाबाअवि/४/नामांकन/१४४/२०२६
दिनांक : ०२/०९/२०२६

प्रति,
प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

विषय : शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता सर्व अभ्यासक्रमाच्या माजी विद्यार्थ्यांचे हिवाळी -२०२६ करीता परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, हियाळी -२०२६ परीक्षा करीता माजी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र दिनांक **०५/०९/२०२६ ते १५/०९/२०२६** पर्यंत ऑनलाईन भरावयाचे आहे.

ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करावयाची आहे.

ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे :-

१) विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र त्यांना महाविद्यालयाने वितरित केलेल्या Login ID आणि Password द्वारेच **https://sgbau.ucanapply.com** या संकेतस्थळावर जाऊन Student या Tab वर Click करुन भरण्यात यावे. {विद्यार्थ्यांनी आवेदनपत्राची Print out काढून महाविद्यालयात जमा न केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक (Roll No.) प्राप्त होणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.}

२) विद्यार्थ्यांनी हिवाळी -२०२६ परीक्षेचे विहित केलेले परीक्षा शुल्क Payment Gateway व्दारे Online पद्धतीने ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र सादर करते वेळीच विद्यापीठ खाती जमा करण्यात यावे.

३) ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क ऑनलाईन भरणे शक्य नाही, किंवा ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालये सादर करीत असतील, अशा विद्यार्थ्यांचे विहित परीक्षा शुल्क एकत्रितरित्या महाविद्यालयांनी त्याच्या Login मधून Online Payment या टॅब मधुन भरण्यात यावेत. (महाविद्यालयांना परीक्षा शुल्क विद्यापीठ खाती जमा करण्याकरीता विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही.)

४) विद्यार्थ्यांनी सादर केलेले ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने Verified करणे अनिवार्य आहे. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची Verified यादी Report Section मधून काढावी.

५) Verification झाल्यानंतर Verification यादी विहित केलेल्या तारखेच्या आंत विद्यापीठात सादर करावी. (महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षाआवेदनपत्राची Print out महाविद्यालातच जतन करण्यात यावी.)

(टिप-

१. दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती (दिव्यांग प्रमाणपत्र व इतर आवश्यक दस्तऐवजांसह) महाविद्यालयाने स्वतंत्रपणे विद्यापीठामध्ये सादर करावी व त्यानंतरच विद्यापीठाद्वारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.
२. विद्यार्थ्यांचा Login ID आणि Password हा विद्यार्थ्याच्या मुळ महाविद्यालयातूनच उपलब्ध होईल.
३. जर एखाद्या नियमीत विद्यार्थ्यांने मागील परीक्षेकरीता नियमीतसाठी परीक्षा आवेदनपत्र भरले नसेल अश्या विद्यार्थ्यांने हिवाळी -२०२६ परीक्षेकरीता नियमीतच्या ऐवजी माजी म्हणुन ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भरावे व महाविद्यालयाने अश्या विद्यार्थांचे अंतर्गत सत्र गुण सविस्तरपणे पत्राद्वारे विद्यापीठात सादर करावे.
४. महाविद्यालयांनी / विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क परीक्षा आवेदन पत्र भरल्यानंतर **Payment Gateway** व्दारे भरावे.
५. **ज्या परिक्षांचे निकाल अद्यापपर्यंत जाहिर झालेले नसतील अश्या परिक्षांचे परिक्षा आवेदन पत्र भरण्याकरिता लिंक निकाल जाहिर झाल्यानंतर १० दिवस पर्यंत सुरू राहील याची नोंद घ्यावी.**

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला,

Online Section Incharge,
तथा उपकुलसचिव (नामांकन)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

CS Scanned with CamScanner

शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

हिवाळी परीक्षा-2026 करीता परीक्षा फॉर्म संबंधी माजी विद्यार्थ्यांकरीता सूचना

दि. 04-09-2026

हिवाळी परीक्षा-2026 करीता प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या व परीक्षेस पात्र असणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण/माजी विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदन पत्र दिनांक **05-09-2026** ते **15-09-2026** पर्यंत ऑनलाईन भरावयाचे आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या तारखेच्या आत सदर भरलेल्या परीक्षा आवेदनपत्राची **Print out** काढावी व परिक्षेचे विहित केलेले परीक्षा शुल्क **Payment Gateway** व्दारे **Online** पध्दतीने ऑनलाईन परीक्षा आवदेनपत्र सादर करते वेळीच विद्यापीठ खाती जमा करण्यात यावे. (सदर विद्यार्थ्यांने त्याच्या परिक्षा आवदेनपत्रावरील नमुद फी Payment Gateway व्दारे भरावी.)

विद्यार्थ्यांनी आवेदनपत्राची **Print out** काढुन महाविद्यालयात सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 यावेळेत जमा करावे. आवेदनपत्राची **Print out** जमा केल्यावर **महाविद्यालयाच्या रजिस्टरवर सही करणे आवश्यक आहे, अन्यथा फॉर्म जमा केला नाही असे समजण्यात येईल, त्यामूळे विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक व परिक्षा कार्ड प्राप्त होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.**

यासोबत रु.40/- सेवा शुल्क नगदी महाविद्यालयात परिक्षा आवदेनपत्र सादर करतेवेळी जमा करावे.

** विद्यार्थ्यांनी आपला परिक्षा फॉर्म भरतांना आपण परिक्षेस पात्र असल्याची खात्री करुनच परिक्षा फॉर्म भरावा. परीक्षेला पात्र नसतांना परिक्षा फॉर्म भरल्यास, भविष्यात येणाऱ्या अडचणींसाठी विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील, यात महाविद्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, याची नोंद घ्यावी. **विद्यार्थ्यांना परिक्षा फॉर्म प्रक्रिये संबंधी कोणतीही अडचण किंवा शंका असल्यास, आपल्या शिक्षकांशी किंवा महाविद्यालयाच्या कार्यालयात संपर्क करावा.***

फॉर्म भरतांना खालील सुचनांचे पालन करावे-

01) **सेमिस्टर-1 च्या विद्यार्थ्यांनी** सेमिस्टर-1 च्या शेवटच्या व **सेमिस्टर-2 च्या विद्यार्थ्यांनी** सेमिस्टर-2 च्या शेवटच्या गुणपत्रिकेची साक्षांकीत केलेली 01 सत्यप्रत जोडावी.

02) **सेमिस्टर-3 च्या विद्यार्थ्यांनी** सेमिस्टर- 3 च्या शेवटच्या व **सेमिस्टर-4 च्या विद्यार्थ्यांनी** सेमिस्टर- 4 च्या शेवटच्या गुणपत्रिकेची साक्षांकीत केलेली 01 सत्यप्रत जोडावी.

03) **सेमिस्टर-5 च्या विद्यार्थ्यांनी** सेमिस्टर- 5 च्या शेवटच्या व **सेमिस्टर-6 च्या विद्यार्थ्यांनी** सेमिस्टर- 6 च्या शेवटच्या गुणपत्रिकेची साक्षांकीत केलेली 01 सत्यप्रत जोडावी.

04) **ज्या विद्यार्थ्याचे Internal किंवा Practical विषय राहिले असल्यास संबंधित विषयाच्या शिक्षकांशी त्वरीत संपर्क करावा.**

05) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परिक्षा आवेदनपत्र काळजीपूर्वक भरावे, अपूर्ण माहिती बददल विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

06) Login ID आणि Password करिता विद्यार्थ्यांनी महाविद्यालय कार्यालयात संपर्क करावा.

07) विद्यार्थ्यांनी हिवाळी-2026 करीता भरलेले परिक्षा आवेदन पत्रच महाविद्यालयात जमा करावे. त्यापुर्वीचे भरलेले परिक्षा आवेदन पत्र महाविद्यालयात जमा केल्यास तो रदद समजण्यात येईल.

08) जर एखाद्या नियमीत विद्यार्थ्याने मागील परीक्षेकरीता नियमीतसाठी परीक्षा आवेदनपत्र भरले नसेल अश्या विद्यार्थ्याने हिवाळी-2026 परीक्षेकरीता नियमीतच्या ऐवजी माजी म्हणुन ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भरावे.

09) विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या Website वर जाहिर केलेल्या परीक्षेच्या वेळापत्रकाचे अवलोकन करुन आपल्या परीक्षेच्या **पाच दिवस आधी परीक्षा प्रवेशपत्र (Examination Admission Card) महाविद्यालयातून घेऊन जावे.**

अधिक माहितीकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे पत्र क्रमांक संगावाअवि/4/नामांकन/144/2026, दिनांक 02-09-2026 चे अवलोकन करावे. **मार्कशिट आली नसल्यास विद्यार्थ्यांनी Internet वरील Marksheet ची Print लावून परिक्षा फॉर्म भरावा.**

Principal
Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College
AKOLA (M.S.)

CS Scanned with CamScanner